आपल्या बातम्या, आतल्या बातम्या...
आपलं महानगर | My महानगर.com
www.mymahanagar.com

# स्मार्ट इंडिया हॅकेथॉन-२०२४ स्पर्धेत के. के. वाघ प्रथम




✦ नाशिक । भारत सरकारच्या मानव संसाधन विकास मंत्रालयातर्फे घेण्यात आलेल्या स्मार्ट इंडिया हॅकेथॉन - २०२४ स्पर्धेत के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सॉफ्टवेअर आणि हार्डवेअर या दोन्ही प्रकारात उल्लेखनीय यश संपादन करत देशात प्रथम क्रमांक पटकावला. यावेळी तीन संघांना एकूण २ लाख ५० हजारांचे रोख पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले. विशेष म्हणजे, २०२२, २०२३ व २०२४ सलग तिसऱ्यांदा या स्पर्धेत विजय मिळवत के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाने विजयासह बक्षीसांची हॅटट्रिक केली.

११ व १२ डिसेंबर २०२४ रोजी सॉफ्टवेअर प्रकारासाठी आणि ११ ते १५ डिसेंबर २०२४ या कालावधीत हार्डवेअर प्रकारासाठी स्मार्ट इंडिया हॅकेथॉन २०२४ ही स्पर्धा पार पडली. प्राथमिक फेरीतील पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांची अंतिम फेरीत निवड झाली. त्यात नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी श्रीनगर येथील नोडल सेंटर येथे तृतीय वर्ष संगणक विभागात शिकत असलेले हरिष लुकारे, प्रिती राठी, सायली उगलमुगले, किशन माळी, तन्मय तांबट, प्रद्युम्न पाटील यांनी मिनिस्ट्री ऑफ सोशल जस्टीस अँड एम्पॉवरमेंट यांनी दिलेल्या प्रॉब्लेम स्टेटमेंट वर प्रकल्प सादर केला. त्यास १ लाख रुपयांचे पारितोषिक प्राप्त झालेले आहे. विद्यार्थ्यांना प्रा. प्रिया रकिबे यांचे मार्गदर्शन लाभले.

इंडियन इन्स्टिटयूट ऑफ टेकनॉलॉजी, तिरुपती येथील नोडल सेंटर येथे झालेल्या हॅकेथॉन स्पर्धेत सॉफ्टवेर प्रकारात पर्णिका पाटील, हर्षल पाटील, पंकज मराठे, प्रतीक चंद्रात्रे, आदित्य देवळालीकर, अथर्व गाडेकर यांनी मिनिस्ट्री ऑफ आयुष यांनी दिलेल्या प्रॉब्लेम स्टेटमेंट वर प्रकल्प सादर केला. द्वितीय, तृतीय वर्ष संगणक सायन्स आणि डिझाईन व आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड डेटा सायन्स अभियांत्रिकीमध्ये शिकत असलेल्या या संघाने प्रथम क्रमांक पटकाविला. त्यास १ लाख रुपयांचे पारितोषिक प्राप्त झालेले आहे. विद्यार्थ्यांना प्रा. प्रिया रकिबे यांचे मार्गदर्शन लाभले. इंडियन इन्स्टिटयूट ऑफ टेकनॉलॉजी रुर्की येथे झालेल्या हॅकेथॉन स्पर्धेत हार्डवेअर प्रकारात ओसिनिया क्षेत्रिमयूम, अक्षदा खैरनार, मेघराज भावसार, श्रेय साळुंखे, ईशान जावळे, प्रणव प्रजापती या गव्हर्नमेंट ऑफ हिमाचल प्रदेश यांनी दिलेल्या प्रॉब्लेम स्टेटमेंट वर प्रकल्प सादर केला. द्वितीय, तृतीय वर्ष संगणक अभियांत्रिकी व आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड डेटा सायन्स अभियांत्रिकीमध्ये शिकत असलेल्या या टीमने उत्तम सादरीकरण करून प्रथम क्रमांक पटकाविला. त्यांना ५० हजारांचे पारितोषिक मिळाले. विद्यार्थ्यांना प्रा.श्वेता जाधव व प्रा. प्रिया रकिबे यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष समीर बाळासाहेब वाघ, संचालक मंडळ, सचिव प्रा. बंदी, प्राचार्य डॉ. नांदूरकर, संगणक विभागप्रमुख डॉ.एस एम कमलापूर, प्रा. डॉ. मुंजे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.